MHJG190008312022

**दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक १६०/२०२२ मधील निशाणी १ वरील आदेश.**

**CNR NO.MHJG190008312022**

१. प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार क्र.१- निलीमा जगन्नाथ कचवे (पाटील), अर्जदार क्र.२- आशुतोष जगन्नाथ कचवे (पाटील), अर्जदार क्र. ३- सुहासिनी प्रमोद पाटील व अर्जदार क्र. ४- तेजस्विनी जगन्नाथ कचवे (पाटील) लग्नानंतरचे नाव तेजस्विनी महेश पाटील यांनी बॉम्बे रेगुलेशन १८२७ चे कलम २ प्रमाणे मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जातील अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदारांचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रस्तुतच्या अर्जामध्ये अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) यांची अर्जदार क्र. १ ही पत्नी, अर्जदार क्र. २ मुलगा व अर्जदार क्र. ३ व ४ या मुली आहेत. मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) हे दिनांक ०४/११/२०२१ रोजी मौजे अंबापिंप्री, ता. पारोळा, जि. जळगांव येथे मयत झाले आहेत. तसेच मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) यांची आई नामे व्दारकाबाई भगवान

कचवे (पाटील) या दिनांक ३०/०५/२००२ रोजी मयत झाल्या आहेत. तसेच मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) यांना प्रस्तुत अर्जदार यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाही. त्यामुळे अर्जदार यांनी ते मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र त्यांना मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) यांचे मृत्युपश्चात त्यांचे नावे असलेल्या चल व अचल मिळकती– १– मौजे अंबापिंप्री शिवारातील शेत जमीन गट नं. १०८/१, क्षेत्र ० हेक्टर ३३ आर, आकार १ रुपये ७० नये पैसे, २– मौजे अंबापिंप्री शिवारातील शेत जमीन गट नं. १०८/२, क्षेत्र ० हेक्टर ३६ आर, आकार १ रुपये ०० नये पैसे, ३– मौजे अंबापिंप्री शिवारातील शेत जमीन गट नं. १०५, एकुण क्षेत्र २ हेक्टर ०७ आर, यापैकी मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) यांचे मालकीचे व कब्जातील क्षेत्र ० हेक्टर ६० आर, आकार २ रुपये ०५ नये पैसे, ४– मौजे अंबापिंप्री शिवारातील शेत जमीन गट नं. १३७, एकुण क्षेत्र १ हेक्टर ०८ आर, यापैकी मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) यांचे मालकीचे व कब्जातील क्षेत्र ० हेक्टर ६० आर, आकार ४ रुपये २८ नये पैसे, ५– मौजे अंबापिंप्री ग्रामपंचायत हद्दीतील तिन मजली आर.सी.सी. बांधीव घर मिळकतच तिचा नमुना नं. ८ सदरी असलेला मिळकत क्र. २१४/ब, क्षेत्र ६०० चौरस मिटर, ६– मौजे अमळनेर नगर पालिका हद्दीतील गट नं. १३७७ यातील प्लॉट नं. १ चे क्षेत्र ६४५.०९ चौरस मिटर या जागेवर असलेल्या ओमशांती कॉर्नर या नावाने इमारत बांधीव असुन त्या इमारतीपैकी दुस–या मजल्यावरील बांधीव फ्लॅट नं. २१ त्याचे एकुण क्षेत्र ४८.२ चौरस मिटर (सदर मिळकत ही प्रस्तुत अर्जातील अर्जदार क्र. २ व मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) यांनी सामाईक नावे

खरेदी घेतलेली, ७– मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) यांचे नावे आर.टी.ओ. दप्तरी नोंद असलेली चारचाकी टाटा कंपनीची व नेक्सॉन मॉडेल असलेली कार तिचा नोंदणी क्र. एम.एच. १९ सी.यु. ४१४२, ८– मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) यांचे नावे आर.टी.ओ. दप्तरी नोंद असलेली दुचाकी वाहन तिचा नोंदणी क्र. एम.एच. १९ डी.आर. ४१४२ यांना वारसदार म्हणुन त्यांचे नांवे समाविष्ठ करणेकामी/नांवे लावण्याकरीता तसेच इतर शासकीय व निमशासकिय कामासाठी आवश्यक असल्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे व तो मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

४. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठर्थ अर्जदार क्र.१– निलीमा जगन्नाथ कचवे (पाटील) यांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी ११ वर दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी प्रस्तुत अर्जातील मजकुराची पुनरावृत्ती केलेली आहे. तसेच अर्जदार यांनी प्रस्तुत कामी नि. ३ सोबत अ.क्र. १ वर मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) यांचे मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत, अ.क्र. २ वर मयत व्दारकाबाई भगवान कचवे (पाटील) यांचे मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत, अ.क्र. ३ वर मौजे अंबापिंप्री शिवारातील शेत जमीन गट नं. १०८/१ ची ७/१२ उता–याची प्रत, अ.क्र. ४ वर मौजे अंबापिंप्री शिवारातील शेत जमीन गट नं. १०८/२ ची ७/१२ उता–याची प्रत, अ.क्र. ५ वर मौजे अंबापिंप्री शिवारातील शेत जमीन गट नं. १०५ ची ७/१२ उता–याची प्रत, अ.क्र. ६ वर मौजे अंबापिंप्री शिवारातील शेत जमीन गट नं. १३७ ची ७/१२ उता–याची प्रत, अ.क्र. ७ वर मौजे अंबापिंप्री ग्रामपंचायत हद्दीतील घर मिळकत नमुना नं. ८ चा मिळकत क्र. २१४/ब चे नमुना नं. ८ ची मुळ प्रत,

अ.क्र. ८ वर मौजे अमळनेर नगर पालिका हद्दीतील गट नं. १३७७ यातील प्लॉट नं. १ चे क्षेत्र ६४५.०९ चौरस मिटर या जागेवर असलेल्या ओमशांती कॉर्नर या नावाने इमारत बांधीव असुन त्या इमारतीपैकी दुस–या मजल्यावरील बांधीव फ्लॅट नं. २१ त्याचे एकुण क्षेत्र ४८.२ चौरस मिटर सदर मिळकत ही प्रस्तुत अर्जातील अर्जदार क्र. २ व मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) यांनी सामाईक नावे खरेदी घेतलेली त्याची सुची क्र. २ ची छायांकित प्रत, अ.क्र. ९ वर मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) यांचे नावे आर.टी.ओ. दप्तरी नोंद असलेली चारचाकी टाटा कंपनीची व नेक्सॉन मॉडेल असलेली कार तिचा नोंदणी क्र. एम.एच. १९ सी.यु. ४१४२, चे आर.सी.बुक ची प्रमाणित प्रत, अ.क्र. १० वर मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) यांचे नावे आर.टी.ओ. दप्तरी नोंद असलेली दुचाकी वाहन तिचा नोंदणी क्र. एम.एच. १९ डी.आर. ४१४२, आर.सी.बुक ची प्रमाणित प्रत, अ.क्र. ११ ते १४ वर अर्जदार क्र. १ ते ४ यांचे आधार कार्डची प्रमाणीत प्रत व अ.क्र. १५ वर मौजे अंबापिंप्री येथील मुल्यांकन पत्रकाची प्रमाणित प्रत, तसेच निशाणी १५ सोबत अ.क्र. १ वर मौजे अमळनेर नगर पालिका हद्दीतील गट नं. १३७७ यातील प्लॉट नं. १ चे क्षेत्र ६४५.०९ चौरस मिटर या जागेवर असलेल्या ओमशांती कॉर्नर या नावाने इमारत बांधीव असुन त्या इमारतीपैकी दुस–या मजल्यावरील बांधीव फ्लॅट नं. २१ त्याचे एकुण क्षेत्र ४८.२ चौरस मिटर सदर मिळकत ही प्रस्तुत अर्जातील अर्जदार क्र. २ व मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) यांनी सामाईक नावे खरेदी घेतलेली त्याची सुची क्र. २ ची प्रमाणित प्रत ही कागदपत्रे दाखल केलेली आहेत. तसेच नि. १० सोबत दि.२२/११/२०२२ रोजीचे दैनिक लोकशाही मध्ये प्रसिध्द केलेले जाहिर प्रगटन दाखल

केलेले आहे.

५. प्रस्तुत प्रकरणात दि.२२/११/२०२२ रोजीचे दैनिक लोकशाही मध्ये जाहिर प्रगटन देऊन मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) यांना प्रस्तुत अर्जातील अर्जदारांचे व्यतिरीक्त अन्य कोणीही वारस आहेत काय किंवा प्रस्तुतच्या अर्जास कुणाचा आक्षेप आहे का याबाबत विचारणा करण्यात आली होती. परंतु प्रस्तुत अर्जदारांचे शिवाय मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) यांचे वारस असल्याबाबतचा आक्षेप प्रस्तुत प्रकरणात कोणीही हजर होऊन घेतलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात देण्यात आलेला अर्जदार यांचा तोंडी व कागदोपत्री पुराव्यानुसार प्रस्तुत अर्जदार हे मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) यांचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र असून अर्जदार यांनी विनंती केल्याप्रमाणे त्यांना ते मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात प्रदाण करणे न्यायोचीत आहे. सबब हे न्यायालय खालील आदेश पारीत करीत आहे–

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात आला.

२. अर्जदार क्र.१– निलीमा जगन्नाथ कचवे (पाटील), अर्जदार क्र.२– आशुतोष

जगन्नाथ कचवे (पाटील), अर्जदार क्र. ३– सुहासिनी प्रमोद पाटील व अर्जदार क्र. ४– तेजस्विनी जगन्नाथ कचवे (पाटील) लग्नानंतरचे नाव तेजस्विनी महेश पाटील हे मयत जगन्नाथ भगवान कचवे (पाटील) यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात प्रस्तुत अर्जात नमुद कारणासाठी व इतर शासकीय व निमशासकीय कामासाठी त्याबाबतचे आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर प्रदान करण्यात यावे.

३. अर्जदारांनी क्षतीपुर्ती बंधपत्र (Indemnity Bond) द्यावे.

( एम. एस. काझी )

दिनांकः– १०/०२/२०२३. सह दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, पारोळा.